Kvisoft PDF Merger DEMO : Purchase from www.kvisoft.com to remove the watermark

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५
फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/८००८/२०१८ दिनांक २५/०९/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— गुरूवार, दिनांक २७/०९/२०१८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, नागभीड जि. चंद्रपूर येथे आयोजीत कार्यशाळेबाबत.**

**संदर्भ :— राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, नागभीड जि. चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक RMGCN/1760/2018 दिनांक २५/०९/२०१८**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, गुरूवार, दिनांक २७/०९/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, नागभीड जि. चंद्रपूर येथे सदर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग, बॉटन टिचर्स असोशिएशन, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, नगर परिषद, नागभीड, जि. चंद्रपूर, वन विभाग, वन परिक्षेत्र, नागभीड, ब्रम्हपूरी वन विभाग, भारतीय ग्रामीण आदिवासी विकास संस्था, पारडी, सार्वभौम ग्रामसभा, चोरटी, आदिवासी विकास समिती, ब्रम्हपूरी, संचालक समन्वय समिती भुवैकुंठ आत्मानुसंधान केंद्र, अडयाळ टेकडी, गोंडवाना हर्बस् वन औषधी, संकलन व प्रक्रिया केंद्र, वन विभाग, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय विभागीय **''वैदू संमेलन आणि औषधी वनस्पती, रानभाज्या प्रदर्शनी व स्पर्धा''** चे आयोजन करण्यात आलेले आहे.

करीता आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या प्राध्यापकांना याबाबत अवगत करून देण्यात यावे व त्यांना आपल्या स्तरावरून वैदू संमेलन आणि औषधी वनस्पती, रानभाज्या प्रदर्शनी व स्पर्धेस उपस्थित राहण्यास कर्तव्य रजा मंजुर करण्यात यावी, ही विनंती.

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

4933 25/9/18

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरीव्दारा संचालित

# राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय

## नागभीड जि. चंद्रपुर 441205

*Accredited with NAAC 'B' Grade*

(गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी संलग्नित)

प्राचार्य
डॉ. अनिल एन. कोरपेनवार
एम्.एस्.सी.,एम्.फिल्,पीएच्.डी.
E-mail: korpenwar@gmail.com

एसटीडी : 07179
कार्यालय : 240883
Web-www.rmgcollegenagbhid.org
nagbhid.rmgcollege@gmail.com

---

जावक क्र.RMGCN/1760 /2018
दिनांक : 25/09 /2018

प्रति,

मा. कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली

**विषय :– गोंडवाना विद्यापीठातील प्राध्यापकांना दि. 27 सप्टेबंर 2018 ला कर्तव्य रजा देण्याकरीता मा. प्राचार्यांना कळविण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, आमचे महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग, रा. म. गांधी महाविद्यालय, नागभीड, बॉटनी टिचर्स असोसीएशन, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, नगर परीषद, नागभीड, जि. चंद्रपूर, वन विभाग, वन परीक्षेत्र, नागभीड, ब्रम्हपुरी वन विभाग, भारतीय ग्रामीण आदिवासी विकास संस्था, पारडी, सार्वभौम ग्रामसभा, चोरटी, आदिवासी विकास समिती, ब्रम्हपुरी, संचालन समन्वय समिती भुवैकुंठ आत्मानुसंधान केंद्र, अडयाळ टेकडी, गोंडवाना हर्बस् वन औषधी, संकलन व प्रक्रिया केंद्र, वन विभाग, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने 1 दिवसीय विभागीय **"वैदू संमेलन आणि औषधी वनस्पती, रानभाज्या प्रदर्शनी व स्पर्धा" चे** आयोजन दि. 27/09/2018 रोज गुरूवारला वेळ सकाळी 10.00 वा. करण्यात आलेले आहे.

करीता आपणांस विनंती आहे की, आपल्या विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांना या वैदू संमेलनाकरीता सहभागी प्राध्यापकांना कर्तव्य रजा देण्यात यावी. असे आपल्या विद्यापीठाव्दारे कृपया कळविण्यात यावे.

धन्यवाद !

Dr. Anil N. Korpenwar
**Principal**
**Rashtrapita Mahatma Gandhi Arts & Science College, Nagbhid, Dist. Chandrapur.**

डॉ. भिलारे
25/9

Letter 2

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरी द्वारा संचालित

# राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय
## नागभीड, जि. चंद्रपूर ४४१२०५



नॅक नामांकित 'ब' दर्जा

E-Mail : nagbhid.rmgcollege@gmail.com
Website:www.rmgcollegenagbhid.org

एक दिवसीय विदर्भस्तरीय



# वैदू संमेलन आणि औषधी वनस्पती, रानभाज्या प्रदर्शनी व स्पर्धा

दिनांक : गुरुवार, २७ सप्टेंबर २०१८ वेळ स. १० वा.
स्थळ : रुख्मिनी सभागृह, नागपूर रोड, नागभीड ता. नागभीड जि. चंद्रपूर

प्रति,

श्री/श्रीमती ________________________________

________________________________________

### आयोजक

वनस्पतीशास्त्र विभाग
राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय
नागभीड, जि. चंद्रपूर

### सहआयोजक

- नगर परिषद, नागभीड, जि. चंद्रपूर
- वन विभाग, ब्रम्हपुरी, वन परिक्षेत्र, नागभीड जि. चंद्रपूर
- बॉटनी टिचर्स असोसीएशन, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
- संचालन समन्वय समिती भुवैकुंठ आत्मानुसंधान केंद्र, अड्याळ टेकडी ता. नागभीड, जि. चंद्रपूर
- गोंडवाना हर्बस्, गडचिरोली
- भारतीय ग्रामीण आदिवासी विकास संस्था, पारडी
- आदिवासी विकास समिती, ब्रम्हपुरी
- सार्वभौम ग्रामसभा, चोरटी

महोदय,

स.न.वि.वि.

विज्ञान शिक्षणाची कुठल्याही प्रकारची सोय नसलेल्या नागभीड तालुक्यात आरमोरी येथिल मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणा–या संस्थेने राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालयाची 2008 साली स्थापना केली. गेल्या 10 वर्षापासून ते सद्यस्थितीपर्यंत संस्थेचे अध्यक्ष, सन्माननीय श्री. मुरलीधररावजी वनमाळी यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय प्रामाणिकपणे व निष्ठेने ज्ञानदानाचे पवित्र कार्य सामाजीक भान ठेवून करीत आहे. या कार्यामुळेच नागभीड व परिसरातच नव्हे तर चंद्रपूर जिल्हयामध्ये सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदु हे महाविद्यालय राहीलेले आहे. अल्प कालावधीत नॅक मुल्याकंन करणारे गोंडवाना विद्यापीठातील एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला नॅक बंगलोर यांनी "ब" श्रेणीचे मानांकन प्रदान केलेले आहे.

**प्रस्तावना :–**

भारताला आयुर्वेदशास्त्राचा इ. स. पुर्व 6000 वर्षापासुनचा दैदिप्यमान इतिहास लाभलेला आहे. आपले असंख्य पूर्वज निसर्गातील उपलब्ध वनस्पतींचा वापर अन्न व औषध म्हणुन करत आलेले आहेत. या संबंधातील पांरपारिक ज्ञान (Traditional Knowledge) पिढयानपिढया पुढे चालत आहे. पंरतु आजच्या घडीला हे पांरपारिक ज्ञान आणि नैसर्गिक वनऔषधींचा वापर खुप मोठया प्रमाणात घटलेला आहे. पारंपारिक ज्ञानावर आधारित नैसर्गिक वनऔषधींचा वापराऐवजी कृत्रीम औषधपध्दतीचे अनेक दुष्परिणाम लोकांना सध्या सहन करावे लागत आहेत. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी आपल्याला पारंपारिक ज्ञानावर आधारित नैसर्गिक वनऔषधींचा सामान्य लोकांच्या जीवनात वापर वाढवावा लागणार आहे. वैद्यकशास्त्रानुसार नैसर्गिक वनऔषधींचा वापर करून रोग्यांना बरे करण्याचे काम आजही अनेक वैदू करीत आहे. वैदू म्हणजे ग्रामीण भागातील, पारंपारीक पध्दतीने औषधी वनस्पतींच्या अगांचे औषध योजना करणारे, काहिंसे अल्पशिक्षीत पण औषध योजना करण्यात पूर्णतः सुशिक्षीत असणारे व्यक्तीमत्व होय. आज आधुनिक काळात वैघकशास्त्र झपाटयाने प्रगती करीत आहे. त्यामागील प्रेरणा ही या वैदूचींच होती. मात्र अलीकडे पारंपारीक ज्ञानाने संपन्न असणा–या या वैदू परंपरेचा समाजाला विसर पडत चाललेला आहे. त्यामुळे हा वैदू व वैदू परंपरा ही काहीसी दूर्लक्षीत झालेली आहे. त्यांची ही परंपरा व वैद्यकशास्त्रातील वैदूंचे योगदान, विविध वनऔषधी, रानभाज्या, त्यांची वापरण्याची विधी यावर व्यापक चर्चा घडून आणणे व वैदूंच्या वैदयक कार्याची समाजाला नव्याने ओळख व्हावी तसेच वैदूंच्या परंपरागत ज्ञानाचा आणि पंरपरांचे जतन होणे गरजेचे आहे

आपल्या आहारात संकरीत पध्दतीने विकसित केलेल्या भाज्यांचा/फळांचा वापर खुप मोठया प्रमाणात होत आहे. मुळात निसर्गात औषधी गुणधर्म आणि पौष्टिक तत्वे असलेल्या शेकडो वनस्पती आपल्या आसपास आहेत. अशा वनस्पतींचा आपल्या आहारात समावेश असणे हे सुदृढ समाज होण्यासाठी अत्यावश्यक आहे. या उद्देश पुर्तीसाठी महाविद्यालयाने विभागीय "वैदू संमेलन आणि औषधी वनस्पती व रानभाज्या" प्रदर्शनी आयोजीत केले आहे. समाजाला पर्यायाने राष्ट्राला परमवैभवाकडे नेण्यासाठी आपण या संमेलनाला सादर निमंत्रित आहात.

संकल्पना..............................

१) वन औषधी प्रदर्शनी व सजीव औषधी वनस्पती स्पर्धा

२) रान भाज्या प्रदर्शनी व स्पर्धा

३) रान भाज्यांचे पदार्थ स्पर्धा

## स्पर्धा

### सजीव औषधी वनस्पती

(टिप : सजीव औषधी वनस्पतींची रोपे कुंडीत किंवा पिशवीत असावी)

| प्रथम पुरस्कार | व्दितीय पुरस्कार | तृतीय पुरस्कार |
|---|---|---|
| 1st ७०१/- | 2nd ५०१/- | 3rd ३०१/- |

प्रोत्साहनपर बक्षिस रुपये १०१/-

### रानभाज्या

(टिप : ताज्या रानभाज्या विविध प्लेट्ल मध्ये मांडावे)

| प्रथम पुरस्कार | व्दितीय पुरस्कार | तृतीय पुरस्कार |
|---|---|---|
| 1st ७०१/- | 2nd ५०१/- | 3rd ३०१/- |

प्रोत्साहनपर बक्षिस रुपये १०१/-

### रानभाज्यांचे पदार्थ

(टिप : बनविलेले पदार्थ प्लेट्समध्ये ठेवावे आणि बनविण्याची कृती लेखी ठेवावी)

| प्रथम पुरस्कार | व्दितीय पुरस्कार | तृतीय पुरस्कार |
|---|---|---|
| 1st ७०१/- | 2nd ५०१/- | 3rd ३०१/- |

प्रोत्साहनपर बक्षिस रुपये १०१/-

नोंदणी शुल्क : स्पर्धेमध्ये भाग घेणाया विद्यार्थी/ विद्यार्थ्यांचा गृप शुल्क ५०/-

विनीत

आयोजक

## डॉ. अनिल एन. कोरपेनवार

प्राचार्य

रा. म. गांधी कला व विज्ञान महाविद्यालय

नागभीड, जि. चंद्रपूर

**समन्वयक**

**डॉ. विकास मोहतुरे** सहा. प्राध्यापक, रा. म. गांधी महाविद्यालय, नागभीड
**श्री. चंद्रकांत चव्हाण** मुख्याधिकारी, नगर परिषद, नागभीड
**श्री. महेश गायकवाड** वनपरिक्षेत्र अधिकारी, नागभीड
**प्रा. टि. पी. बिसेन** अध्यक्ष, बॉटनी टिचर्स असोसिएशन, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**समन्वयक**

**श्री. दयारामजी कन्नाके** सचिव, भारतीय ग्रामिण आदिवासी विकास संस्था, पारडी
**श्री. चेतनभाऊ कवाडकर** सदस्य, सं. स. समिती, भुवैकुंठ आत्मानुसंधान केंद्र, अड्याळ टेकडी
**डॉ. प्रशांत भरणे** गोंडवाना हर्बस्, गडचिरोली
**श्री. क्रांतीवीर नारायणसिंह उईके** अध्यक्ष, आदिवासी विकास समिती, ब्रम्हपूरी
**श्री. मोरेश्वर उईके** अध्यक्ष, सार्वभौम ग्रामसभा, चोरटी

**संपर्क**

प्राचार्य, डॉ. अनिल कोरपेनवार - ९४२२९२६५१७
श्री. चंद्रकांत चव्हाण - ७०२०३६६४३१
डॉ. विकास मोहतूरे - ९९७०८१३१३८
श्री. दयारामजी कन्नाके - ८७६६५४९०८०

शक्ती बॅनर & प्रिन्टर्स, नागभीड
9503121818